Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 1 | September - 2016

# *भारतीय रंगभूमीचा इतिहास*

*डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी*
*टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे.*



प्रस्तावना
इतिहासात केलेला महत्व आहे ऐतिहासिक वारसा असलेली भारतीय रंगभूमी लोकप्रिय आणि करमणुकीसाठी कला प्रकार असला तरी स्वातंत्र्य लढयातील लोकजागृतीसाठी या कलेचा उपयोग झालेला होता.

रंगभूमी– रंगभूमी म्हणजे रंगमंचीय हस्तकला, अभिनय, संगीत आणि नृत्य यांचा संगम होय. नाटक हे लिखित किंवा संहितेच्या स्वरुपात असते. लिखीत स्वरुपातील लिखाण जेंव्हा अभिनय स्वरुपात मांडले जाते तेंव्हा ते रंगभूमीवरील नाटक बनते किंवा संहितेचे रंगमचावरील सादरीकरण म्हणजे नाटक होय. कादंबरी आणि लधुकथांमध्ये जसा फरक आहे तसाच फरक नाटक आणि रंगभूमीमध्ये आहे नाटक सादर करण्यासाठी मोठे सभागृह, मोठे पटांगण, मोठी जागा ज्यावर नट त्यांचा अभिनय सादर करतो ती म्हणजे रंगभूमी होय. नटाचा आवाज शारीरिक हावभाव यामुळेच रंगभूमी ही जिवंतकला मानली जाते.

*रंभूमीचे स्वरुप–* प्रेक्षकांशी सुसंवाद साधणे हा रंगभूमीचा मुळ उद्देश असतो कथा सांगणे, संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रंगभूमी हे माध्यम होते. यामध्ये नट, त्यांचे हावभाव, नृत्य, नकला यांचाही अंतर्भाव होतो. प्राचीन काळी गावाच्या मध्यभागी किंवा रस्त्यावरच असे प्रयोग केले जात होते. रंगमंचावर दैनंदिन जीवनात धडणाऱ्या धटनांचे प्रत्यक्ष सादरीकरण केले जाते कथाकार किंवा नाटककार स्वतःसंबंधी, त्याचा समाज, देश, संस्कृती त्यांचे पूर्वज याविषयी लिहीत असतो रामायण आणि महाभारत यातील नाटय वर्षानुवर्षे प्रसिद्ध आहे आजही प्रेक्षकांना त्याचे आकर्षण आहे. रंगभूमीचे हे स्वरुप काळानुसार बदलत गेले. उदा. संगीत, आवाज याबरोबरच रंगमंचावर दृकश्राव्य माध्यमांचा वापर केला जातो. पूर्वी दृश्य बदलासाठी पडदयाचा वापर होत असे परंतु आता दृश्य बदलताना प्रकाश योजनेचा उपयोग केला जातो. आधुनिक तंत्रज्ञान जसे बदलले तसतसे रंगभूमीतही त्याचा प्रभाव दिसू लागला.

*मौखिक परंपरा–* भारतीय रंगभूमीचे बीज मौखिक परंपरेत दिसून येते. नट एखादी व्यक्तजी, देवता, कथेमधील पात्र याद्वारे यातील भूमिकेद्वारे रंगमंचावर आपली सादरीकरण करतो. प्राचीन काळात सामाजिक, धार्मिक शिकवण देणारे, रंगमंच हे माध्यम होते मौखिक वर्णनात पौराणिक कथा, प्राण्यांच्या कथा, लोकप्रिय विनोदाच्या स्वरुपात मांडल्या जात. नृत्य, गायन, संगीत हा रंगभूमीचा महत्वाचा भाग होता. या काळात कवि, गायक, संगीतकार आणि नट अशा सर्वच भुमिका एकाचवेळी पार पडत असे भारतामध्ये शतकानुशतके कथाकथनाची परंपरा चालू असल्याने रंगभूमी ही आपल्या स्मृतीकोषातील महत्वाचा भाग आहे. भारतीय रंगभूमी मोठया प्रमाणावर आपल्या प्राचीन धार्मिक कथा, लोक अख्यायिका, पुराणकथा, त्यातील पात्रे यांचा मोठया प्रमाणावर वापर केला गेला आहे. पोशाख, रंग, सौंदर्य, प्रसाधने आणि पारंपारिक पद्धतीची रंगभूषा आणि संगीत यामुळे ती परिपूर्ण आणि संपन्न आहे.

*वैदिक काळातील रंगभूमी–*
प्राचीन काळापासून मानव नृत्य, गाणी, कथानक याद्वारे सामाजिक आणि सांस्कृतिक दर्शन रंगभूमीद्वारे सादर करीत असे. भारताचे नाटयशास्त्र प्रसिद्ध आहे. मौखिक रुपाने नाटयकला शास्त्र प्राचीन काळापासून अस्तित्वात होते. नाटयशास्त्रातील दंत कथेनुसार देवानी ब्रह्माला सर्वांना पहाता, ऐकता येईल असा वेदातून निर्माण करण्यास सांगितले ब्रह्मदेवांनी बोलणे ऋग्वेदातून, संगीत, सामवेदातून, अभिनय, यजुर्वेदातून भावना म्हणजेच रस अथर्व वेदातून धेवून भरताने या नाटयवेदाचा परिचय सर्वांना

करुन देण्यास सांगितले.

नाटकामध्ये प्रत्यक्ष जीवनातील धटनांचे सादरीकरण केले जाते यातील प्रसंग प्रेक्षकांना विचार करण्यास प्रवृत्त होतात. नाटक हे प्रयोगावर आधारित असल्याने त्यात प्रेक्षक व कलाकाराचाही समावेश होतो. रसशास्त्र हे वेगवेगळया भावना कशा व्यक्त कराव्यात यावर आधारित आहेत. १) शृंगार, २) हास्य, ३) करुण, ४) रौद्र, ५) वीररस, ६) भयानक, ७) विभत्स, ८) अद्‌भुत, ९) शांत रस असे भरताने सांगितलेले नऊ रस आहेत. भरतमुनीनी रसांची निर्मिती जरी नाटयकलेच्या संदर्भात केली असली तरी पुढील काळात त्याचा वापर वेगवेगळया कलेच्या क्षेत्रात वैदिक काळात, संस्कृत नाटकातून धार्मिक गोष्टींना महत्व देवून मनोरंजन हा हेतू होता. सुगीच्या हंगामात रंगभूमीच्या उदयाबरोबरच नाटयलेखनाची सुरुवात झाली. प्राचीन काळात नवव्या शतकापर्यंत संस्कृत नाटके शिखरावर पोहचलेली होती. संस्कृत नाटकाचे भारतीय रंगभूमीसाठी मोठे योगदान आहे.

### *लोक रंगभूमी –*

लोकरंगभूमी ग्रामीण व्यक्तीच्या जीवनाचा आरसा आहे पुराणकथा, नृत्य, गायन, नृत्य, आयुष्यातील महत्वपूर्ण धटनांवरच लोकनाटय आधारित असते.

### *लोकनाटयाचे विविध प्रकार –*

महारष्ट्रामध्ये लोकप्रिय लोकनाटय प्रकार म्हणजे तमाशा, ह्या प्रकारात अत्यंत जोशपुर्ण सवाल जवाब विचारले जावून, नृत्य आणि संगीतांवर आधारीत प्रेमकथा सादर केल्या जात. हयामध्ये प्रेम, तडफ आणि शौर्यगाथांनी  रलेले वर्णन असे.

१८ व्या शतकात तमाशा हा राज्यकर्ते आणि मराठे सरदार यांच्या मनोरंजनासाठी सादर केला जात होता. परंतू त्यातील नाची (नाचणारी) संगीत व नृत्यद्वारे आदा करीत असल्यामुळे त्यांची नाच्चकी झाली.

भवआी हा गुजराथमधील एक लोकप्रिय लोकनाटय प्रकार आहे. ह्या लोकनाटयाचे कथा बीजमध्ययुगातील पराक‘मी धुरीणाच्या शौर्यगाथावर आधारित आहे. असहित हा उच्चभ्रु म्हणजे बाह्मण समाजातील कवीने १४ व्या शतकात हा भवआी प्रकार प्रचारात आपणला. असहित हा कसलेला नट व विख्यात गायक होता. तो अस्पृश्याकडे जेवत असे. परिणामस्वरुप म्हणून त्याला त्याच्या जाती मधून बहिष्कृत केले गेले. कवितारचून तो संगीत पेश करुन आणि नट म्हणून आपला चरितार्थ चालवित असे. त्यांनी आपल्या मुलाबाळांनी ही कला शिवली आणि स्वाभाविकच भवाआी हा लोकनाटय प्रकार लोकप्रिय झाला. वाङ्‌मयीन मुल्य असलेल्या जवळ जवळ ३६० नाट्यसंहित त्यांच्या आहेत.

कर्नाटक आणि आंध्रप्रदेशात गेली अनेक शतके अगदी उधडया मोकळया जागेवर–यक्षगान आणि कुचिपुडी हे नृत्य–नाटयप्रकार सादर केला जातो. सादरकर्ते कलाकार हे नजिकाच्या देवळात कायमस्वरुपी निगडीत असत. या नृत्य नाटकाचे कथानक हे पौराणिक कथेवर आधारित आणि ज्यामध्ये क्रोध शौर्य आणि अलौकिकत्य हा गुणाचा असं  ाव असे. त्यामध्ये नृत्याद्वारे शिवस्तुती असावयाची, लढाईचे प्रसंग असावयाचे. खर म्हणजे यक्षगानांत लढाई ही अनिवार्य आहे. यक्षगानात  गवान शंकराचे तांडव नृत्य आणि प्रतिष्ठा यांचे सुंदर मिलाप असावयाचा.

आंध्रामधील कुचिपुडी हे अत्यंत तालवटू संगीत नृत्य–नाटयांचा प्रकार आहे. १५ व्या १६ व्या शतकात बहुतेक सर्व प्राचीन कलांवर वैष्णव पंथाचा प्रभाव फार मोठया प्रमाणांत होता यांच्या  भक्तिमार्गाप्रमाणे रासलीला, हरीकथा, भगवंत कथा, वगैरेचा प्रचार केला गेला. कुचीपुडी नृत्य–नाटयातून ही दया हया गुणावर भर दिला जात असे. भगवान श्रीकृष्णाच्या जीवनांतील प्रसंग कवी जयदेव यांचे गीत गोविंद आणि तत्सम भक्तिगीते हे कुचीपुडी नृत्य–नाटकांचे कथाबीज असे. आंध्र प्रदेशातील कुचीपुडी ह्या खेडयात कुचीपुडी नृत्य–नाटयाचा जन्म झाला. दोन तेलगू ब्राह्मण पूजनीय, वेदांत तीर्थनारायण आणि त्यांचा कुशाप बुद्धीचा शिष्य सिद्धेंद्र योगी ह्या दोधांनी नृत्य–नाटय आकारिले. इतिहासात अशी नोंद आहे की १६७८ मध्ये गोवळकोंडयाचा नवाब अब्दुल हजस ताशीना ह्यांनी कुचीपुडी गावाला भेट दिली त्यावेळी सिद्धेंद्र योगी वृदांना त्याच्यापुढे कुचीपुडी नृत्य सादर केले. नृत्यावर प्रभावित होऊन कुचिपुडी गांव हे त्या नर्तकांना बक्षिस दिले. ह्या दानपत्राच्या आधारावर आजही वेदांत, वैपरी, हरी  गवततुळ हे लोक तिथे कुचिपुडी नृत्याच्या अविवृद्धिसाठी प्रयत्नशील आहेत.

उत्तर प्रदेशातील, नौटंकी हा संगीत नाटयप्रकार ज्यामध्ये ऐतिहासिक योध्यांच्या पराक्रमगाथा गायिल्या जातात. तसेच दरोडेखोरांचा पराक्रम किंवा प्रेमभंग झालेल्या व्यक्तींच्या कथा रेखाटल्या जातात.  भाटांनी केलेले मध्ययुगीन (वार) लिखाण हे त्यांच्या सांगेतीक नाटयपद्धतीने नौटंकिस उदयांस आणले. ह्या प्रकारातील गीते आणि संवाद हे सर्व सामान्य भाषेत आणि लोकगीतांवर अवलंबून असते. तरुणमुले ह्या मध्ये स्त्री–पात्र रंगवित असत.

मद्रासमध्ये पागलवेशम नावाचा आणखी एक लोकनाटय प्रकार प्रचलित आहे. लहान लहान गल्लीबोळात किंवा बाजारात स्वतः एकटाच सादर करीत असे. हे लोकनाटय आंध्रप्रदेश आणि मद्रास मध्ये प्रचलित आहे. सुत्रधार लहान लहान धटनाद्वारे स्वतःच एक चरित्र नायक बनत असे, तो काळजी धेत असे का ज्या ठिकाणी त्याला कोणी ओळखत नसे त्या ठिकाणी तो आपले लोकनाटय प्रयोग करीत असे. तो काही वेळा भिकारी बने, ज्योतिषी, व्यापारी किंवा शिक्षक आणि काहीवेळा बायकोचा धाक नवऱ्याला दाखविणारी भूमिका करावयाचा, काही वेळा नवराबायकोच्या भांडणात, नवरा आपल्या बायकोला रागाच्या  भरात वाऱ्यावर सोडून जातो. स्वाभाविकपणे ती निराधार बायको त्याची विनवणी करीत त्याच्या पाठोपाठ जाते. अशावेळी प्रेक्षक दयेच्या भावनेतून तिला मदत करीत असत त्यानंतर तो चिडलेला, रागवलेला नवरा हसत मुखाने परत येतो. हे सगळे झाल्यानंतर लोकांच्या लक्षात येते की हे खर  भांडण नसून ती जोडी पागलवेशम सादर करीत होती. ह्या जोडीच्या उत्कृष्ट अभिनयाने भारावून जात असत आणि त्यांना अधिक पैसे बहाल करीत खऱ्या अर्थानी पागलवेशमद्वारे ते कलाकार जीवनाचे खरे दर्शन धडवीत असत.

तिरुकुथू हा विशिष्ट लोकनाटय प्रकार मद्रासमध्ये सादर केला जात असे. वेगळया शब्दात मांडावयाचे झाल्यास ते एक

पथनाटय होते. सुगीच्या दिवसात शेतकरी आणि त्यांच्या बायका आपल्या शेतात किंवा धराच्या अंगणात किंवा बाजारात साजरा करीत असत. पौराणिक कथांवर आधारित आणि केळी व नारळाच्या झावळयांनी सुशोभित केलेल्या स्टेजवर हे लोकनाटय सादर केले जात असे. ह्या लोकनाटयात गाणी, कविता, गीते, तालबद्ध बोलण्याची फेक आणि नृत्याला साजेशी उस्फुर्त निरुपण असे. त्यामुळे ही जीवन कला   पासून समारंभाचा एक अविभाज्य भाग असे कथा मात्र सामाजिक जीवनाशी निगडीत असत.

***आधुनिक रंगभूमी –*** १९ व्या शतकात मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे आधुनिक रंगभूमीचा उदय झाला. यामध्ये मध्यमवर्गाचा सहभाग होता. मुंबईतील काही पारसी लोकांनी काही नाटके सादर केली. विविध कंपनीने मुंबई येथे केलेल्या नाटकात, सादरीकरणात आधुनिक तंत्र, नवीन कल्पना आणि विचार असल्याने रंगभूमीवर त्याचा चांगला परिणाम झाला. नवीन म्हणजे प्रेक्षक आणि नाटक यामध्ये पडदा आल्याने नाटक हे करमणुकीचे साधन बनले नाटक निधर्मी बनले. पैसे देवून नाटक पहाण्यास सुरुवात झाली. १९ व्या शतकापर्यंत नाटक मंडळींना मिळणारा राजाश्रय जावून नाटक आता विक्रीय वस्तूप्रमाणे झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात अरविंद धोष, रविंद्रनाथ टागोर हे उत्तम नाटककार झाले. चट्टोपाध्याय, गार्गी, साराभाई यांनी सामाजिक जीवन नाटकातून रेखाटले. भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या काळात सामाजिक सुधारणा, राजकीय स्वातंत्र्याबरोबर वास्तवतेवर भर देण्यात आला. रंगभूमीच्या क्षेत्रात हा काळ नाटककारांनी गाजविला.

स्वातंत्रोत्तर काळात नाटय क्षेत्रात बरीच सुधारणा झाली राजकीय धटना, महाभारत आणि फाळणीवर आधारीत नाटकातून वास्तवतेचे चित्रण केले गेले. स्वातंत्रोत्तर काळात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर भारतातील अनेक नाटक करांनी अनेक विषय मांडले. पण या विषयांना भारतीयतेचा स्पर्श होता.

***संदर्भ साधने–***

१) रंगमंच आणि नाटकी भूमिका– M,.लक्ष्मीकांत पाल.
२) डिस्कव्हरी अहफ इंडिया– पं.जवाहरलाल नेहरु
३) नाटयशास्त्र, भरतमुनी, अधिकारी प्रकाशन, पुणे.
४) नाटयशास्त्र विश्वकोष, राधावल्लभ त्रिपाठी, प्रतिभा प्रकाशन, पुणे–१९९९.
५) भरतप्रणित नाटयमण्डप, M,. र.प. कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई–२००१.
६) महारष्ट्रीय ज्ञानकोश–१, श्रीधर केतकर, आदर्श संस्कृत शोध संस्था, पुणे– शके १९३४.
७) डायमंड सामाजिक ज्ञानकोश, प्र.दीपक दळवी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे–२००७.
८) सिने नाटय संदर्भ ग्रंथ, संपा– सत्यवान ते तांबे.
९) History of Natyashastra, N.P. Unni, New Bhartiya Book, Corporation, Delhi -2004.
१०)Sanskrit Drama – A Perspective Theory and Practice, Registrar, Karnataka University, Dharwar- 2014.